जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. नीलेश बनसोडे, सुरेश बंडगर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
सकाळ

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. नीलेश बनसोडे, तसेच सुरेश बंडगर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
तरुण भारत

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना जयंतीदिनी अभिवादन

कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. निलेश बनसोडे, सुरेश बंडगर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
सकाळ

# 'दूरशिक्षण' एमबीएची आज प्रवेश फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा घेण्यात आली. त्यातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी उद्या, मंगळवारी सकाळी नऊ वाजता राबविण्यात येणार आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रॉडक्शन व्यवस्थापन, तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए( डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
लोकमत

# दूरशिक्षणची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रमार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी आज, मंगळवारी सकाळी नऊ वाजता राबविण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन, तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयांतून एमबीए( डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली आहे. अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन मोरे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024

पुढारी

# 'दूरशिक्षण'ची आज एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रमार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेनुसार विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया फेरी मंगळवार (दि. २) रोजी सकाळी नऊ वाजता राबविण्यात येणार असल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए( डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिलेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024

तरुण भारत

# दूरशिक्षणाची आजपासून एमबीए प्रवेश प्रक्रिया फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रमार्फत एमबीए ( डिस्टन्स मोड)ची विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षेनुसार प्रवेश प्रक्रिया फेरी (दि. २) सकाळी नऊ वाजता सुरू होणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली आहे. एमबीए अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्शन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एमबीए( डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिलेली आहे. विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या मुख्य कार्यालयामध्ये प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन दूरशिक्षणच्या वतीने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 JUL 2024
पुण्यनगरी



# वसंतराव नाईक जयंती उत्साहात

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती सोमवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, डॉ. नीलेश बनसोडे, सुरेश बंडगर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.